महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.९२/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ जुलै, २०१६

संदर्भ -

१) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ /२०१६/१६/१७/३०१/४०८५, दिनांक ५.७.२०१६

२) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ /२०१६/१६/१७/३०१/४१४३, दिनांक ११.७.२०१६

प्रस्तावना -

१. उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन शाळा स्थापन करण्यास अथवा विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्र.स्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रामधील शाळा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे .

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रामधील संबधित शाळांच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सीबीएसई मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर/औरंगाबाद/मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक
६. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), रत्नागिरी/औरंगाबाद /पुणे/ हिंगोली/नागपूर/सोलापूर/धुळे/ठाणे
७. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई(दक्षिण/उत्तर)
८. निवडनस्ती (एसएम-२)

शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१०१६/प्र.क्र.९२/एसएम-२, दिनांक २८ जुलै,२०१६ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | रत्नागिरी | मुकुल माधव फाऊंडेशन,पुणे | मुकुल माधव फाऊंडेशन विद्यालय, गोळप, ता.रत्नागिरी, जि.रत्नागिरी | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| २ | औरंगाबाद | श्री.गुरुदेव प्रतिष्ठाण, औरंगाबाद | श्री.श्री.रविशंकर विद्या मंदीर, कृष्णपुरवाडी, ता.जि.औरंगाबाद | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | इंग्रजी |
| ३ | औरंगाबाद | ओमसाई ओम प्रतिष्ठाण, कमळापूर, ता.गंगापूर जि.औरंगाबाद | छत्रपती संभाजीराजे इंग्लिश प्राथमिक शाळा, वडगाव कोल्हाटी, ता.जि.औरंगाबाद | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ४ | मुंबई (दक्षिण) | पोदार ट्रस्ट फॉर प्रमोशन ऑफ लिटरसी ॲन्ड हायर एज्युकेशन पोददार सेक्टर ,८५ चमार बाग,पोस्ट ऑफिस लेन डॉ.आंबेडकर रोड,-परेल (पुर्व) मुंबई -१२ | पोदार इंटरनॅशनल स्कूल,सर्वे नं १३, शीट नं. ४१३ व ४३८ वरळी हिल इस्टेट, वरळी, मुंबई | नवीन शाळा | आय.बी. | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ५ | मुंबई (उत्तर) | पोदार एज्युकेशन टस्ट पोदार सेंटर ८५ चमार बाग पोस्ट ऑफीस लेन, डॉ.आंबेडकर रोड, परेल,मबई १२ | पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्वे नं.२४, ए, हिरानंदानी पार्क, पवई | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ६ | ठाणे | पोदार एज्युकेशन टस्ट पोदार सेंटर ८५ चमार बाग पोस्ट ऑफीस लेन,डॉ.आंबेडकर रोड, परेल,मंबई १२ | पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्वे नं.१५९/१ आणि २, कोलशेट व्हिलेज, हिरानंदानी इस्टेट, ठाणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ७ | पुणे | पोदार एज्युकेशन टस्ट पोदार सेंटर ८५ चमार बाग पोस्ट ऑफीस लेन,डॉ.आंबेडकर रोड, परेल,मंबई १२ | पोदार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं.१०३/२, प्लॉट B, वडगांव, ता.मावळ, जि.पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ८ | हिंगोली | पोदार एज्युकेशन टस्ट पोदार सेंटर ८५ चमार बाग पोस्ट ऑफीस लेन,डॉ.आंबेडकर रोड, परेल,मंबई १२ | पोदार इंटरनॅशनल स्कुल, गट नं.२१९, मौजे पारोळा, जि. हिंगोली | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ९ | नागपूर | भारतीय उत्कर्ष मंडळ, खापरी, परसोडी, नागपूर | उत्कर्ष विद्यामंदीर, खापरी-परसोडी, नागपूर | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिकला जोडून उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी विज्ञान शाखा) | इंग्रजी |
| १० | नागपूर | राधा गोविंद चॅरीटेबल ट्रस्ट, रिसालदार लेन, महाल नागपूर | वृंदावन कॉन्व्हेंट व ज्युनियर कॉलेज, आपतूर, ता.उमरेड, जि.नागपूर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी |
| ११ | सोलापूर | अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी, अक्कलकोट, जि.सोलापूर | सी.बी.खेडगी इंटरनॅशनल स्कूल, अक्कलकोट, जि.सोलापूर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | इंग्रजी |
| १२ | धुळे | जयहिंद एज्युकेशन ट्रस्ट, जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे | जयहिंद इंग्लिश स्कूल, देवपूर, धुळे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | इंग्रजी |